म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ८१०.९१०
दा. क्र. ६२६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
६२६१

IRBK-0106261
IRBK-0106261

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.



६२६.५
IRBK-0106261

# अकिलीची कहाणी

☆

ओरिसांत घडणाऱ्या
नव्या सोनेरी इतिहासाचें
ओझरतें दर्शन

☆

यदुनाथ थत्ते

चित्रशाळा प्रकाशन पुणे २

किंमत दहा आणे



# अ नु क्र म


१. ओळख ३

२. आकिली ९

३. पाहुणे २३

४. वनवास ३१

५. विनूमहाप्रभू ४१

परिशिष्ट ४६


☆




प्रथमावृत्ति

१ ९ ५ ७


☆


सर्व हक्क

लेखकाधीन



मुद्रक-प्रकाशक

दामोदर त्र्यंबक जोशी

बी. ए. ( टिळक )

चित्रशाळा प्रेस, १०२६

सदाशिव पेठ, पुणें नं. २

[ पुस्तकांतील चित्रें : सुधाकर खाजगीवाले ]

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



## ओळख

: १ :

हा आपला भारत देश. जगांतल्या अगदीं जुन्या जुन्या देशांत याची गणना होते. त्याचें वैभव अपार आहे. उत्तर दिशेला हिमालयासारखा खंबीर रखवालदार आहे. तीन बाजूंनीं रत्नाभरणांचें अभंग कवच आहे. येथें थोर पुरुषांची सतत परंपरा. ग्रीष्माच्या तापानंतर वळवाचा पहिला शिडकावा झाला कीं येथली मातीसुद्धां बोलकी होते. हजारों वर्षें संचित केलेला सुगंध ती मनमुराद उधळते. ह्या भूमीला किती थोर पुरुषांच्या पावन चरणांचा स्पर्श झाला. येथील धूळहि बोलकी आहे. हरप्पा, मोहन-जो-दाडो येथेंच भूमीनें पुण्यपावन आठवणी जतन केल्या आहेत असें नका समजूं. या भूमीचा कण न् कण

सजीव आहे. शिंपला जसा हृदयाशीं मोती धरून बसतो तशी इथली माती इतिहासाचे सोनेरी कण जतन करीत आहे.

हिंदुस्थानचा कोणताहि टापू घ्या : तो टापू कोठला तरी तेजस्वी इतिहास आपल्याला सांगितल्याशिवाय राहणार नाहीं. येथली माती म्हणूनच वंदनीय वाटते.

जुन्या सोनेरी आठवणींचा रवंथ करणाराच हा देश नाहीं. नव्या घटनांचे सोनेरी अलंकार इथें घडविले जातात. हजारों वर्षें अंतःकरणाशीं जतन करून ठेवाव्या अशा या आठवणी आहेत.

भारताच्या पूर्व किनाऱ्यावर बंगाल आणि आंध्र यांच्यामध्यें एक चिंचोळा लहानसा प्रान्त आहे. ओरिसा त्याचें नांव. आधीं हिंदुस्थान गरीब. त्या गरिबांतलाहि हा गरीब प्रान्त. परंतु येथले लोक निकोप अंतःकरणाचे, निकोप मनाचे आहेत.

ह्या गरीब जिल्ह्यांतहि गंजाम, कोरापुट आणि मयूरभंज हे तीन टापू जास्तच गरीब. हा भाग डोंगरा-दऱ्यांचा, जंगला-वनांचा निबिड असा आहे.

ह्या जंगलमय डोंगराळ भागांत सूर्याचा प्रकाश इतरांपेक्षां दोन तास उशिरां पोंचतो. संध्याकाळीं घरीं परतायच्या वेळीं गुराख्यांचीं मुलें आपलीं पांगलेलीं जनावरें एकत्र करून घरची वाट धरतात, त्याप्रमाणें सूर्य आपले किरण गोळा करूं लागतो तेव्हां ह्या जंगलांतले किरण आधीं त्याच्याजवळ पळतात. त्यांना जणुं भीति वाटते कीं परत जातांना आपण एखाद्या वेळीं जंगलांतच विसरून राहूं ! त्यामुळें इतर भागांपेक्षां इथें अंधारतेंहि तास दोन तास लौकर. आकाश पाझरूं लागलें कीं तो वर्षाव वरच्या वर झेलून धरण्याचा प्रयत्न ऐन, खैर, साग हीं झाडें करतात. आधीं कोण हीं मेघाचीं फुलें झेलतो, अशी त्यांच्यांत जणुं स्पर्धा लागलेली असते. ह्या स्पर्धेत भाग घेतल्यामुळें इतरत्र खुजीं-ठेंगणीं आढळणारीं झाडें इथें ताडामाडासारखीं उंचच उंच वाढलेलीं दिसतात. जवळच

गांवाला सोबत करणारा तो ओहोळ आहे. ह्या घनदाट जंगलांत आपल्या मुलांना भीति वाटूं नये म्हणून तो हाकारे देत आहे. वारा ह्या वृक्षांच्या मुरलींतून एक उग्रमधुर संगीत ऐकवतो आहे.


दरएक ठिकाणचा एकेक हंगाम चांगला असतो. काश्मीर-मध्यें जून–जुलै महिन्यांत मोठी गंमत असते. महाबळेश्वराचा एप्रिल–मे महिना मोठा मजेचा. कांहीं कांहीं पक्षी हंगाम साधीत त्या त्या प्रदेशांत संचार करीत असतात. त्यांना निसर्गाचें वेळापत्रक आणि सौंदर्याच्या जागा यांची खडान् खडा माहिती असते. हजारों मैलांच्या भराऱ्या यासाठीं ते मारतात. पण येथलीं निसर्गाचीं लेंकरें कुठें इकडे तिकडे जात नाहींत. येथल्याच सृष्टिमाईला बिलगून असतात. नसलेला हंगाम चालू हंगामापेक्षां बरा असें त्यांना वाटतें.



हिंवाळा येण्याआधीं वाटतें हिंवाळा फार फार बरा. कारण रात्र मोठी असते, दिवस लहान असतो. तेंवढीच पोटाची विवंचना जरा कमी. एकदां झोंप लागली कीं भूक विसरली जाते. जंगलांतून आणलेल्या काड्यापाचोळ्यांची शेकोटी झोपडीच्या एका कोपऱ्यांत


शिलगावून एकदां निद्रामाईच्या कुशींत शिरून डोळे मिटून घेतले कीं झालें ! निद्रामाई अंगाई गीत म्हणते आणि मग पऱ्यांच्या देशांत घेऊन जाते. तिथल्या गमतीजमती, ते अन्नाचे कोट पाहतां पाहतां मन जें रमून जातें तें सकाळीं सूर्य आपल्या उबदार मऊ हातांनीं कुरवाळूं लागेपर्यंत. इथलें ऊनदेखील थंडीनें थोडें गारठलेलेंच असतें. कितीतरी वेळ झाडांच्या शेंड्यावर बसून ते आपल्या गार गार हातांनीं आधीं गुदगुल्या करते. मग निद्रामाईच्या कुशींतलीं लेंकरें डोळे चोळीत उठतात आणि दिवसभर वणवण करतात. शेवटीं शेवटीं थंडी इतकी वाढते कीं शेकोटींतली आगहि गारठते. निद्रा-माईच्या कुसऱ्यांत शिरूनहि ऊब येत नाहीं, डोळ्याला डोळा लागत नाहीं. रात्र असह्य होते. भुकेल्या पोटीं थंडी फारच गांजते आणि हीं निसर्गाचीं लेंकरें म्हणतात यापेक्षां उन्हाळा परवडला.

आणि त्यांची आई त्यांच्या मनांतलें हेरतें. त्यांची आपसांतली कुजबुज ऐकते. सूर्य आपल्या किरणांना घरांतून लौकर बाहेर सोडतो. पहाटेची साखरझोप सोडून एखादा सत्शील विद्यार्थी परीक्षा जवळ आल्यावर त्या धाकानें लौकर उठूं लागतो त्याप्रमाणें लौकर उठून ते किरण जणुं कामाला लागतात. झाडांच्या शेंड्यावर



ते आतां रेंगाळत नाहींत. धापा टाकीतच तेथून खालीं उतरून घरांत शिरतात. थंडी गेल्याचा आनंद क्षणभरच टिकतो. दिवस वाढल्या-बरोबर दुपारची चिंता जास्तच जाळूं लागते. सगळीकडे भगभगीत, भकास झालेलें. पोटांत दिवसरात्र कावळे कोकावतात. त्यांचा आरडा असह्य होतो. कान झाकले, डोळे मिटले तरी त्या कावळ्यांच्या कर्कश ओरडण्यानें झोंप कशी ती लागतच नाहीं.

मुलें दिवसभर 'खायला खायला' करून जीव नकोसा करून सोडतात. काय खायला द्यायचें ? दिवसभर ना काम ना धंदा. मग तहान तहान झाल्याचें निमित्त करून दोन घोट पाणी पिऊन पोट भरायचें ! पण घंट्या अर्ध्या घंट्यांत तें पोट पुन्हां रितें होतें. पुन्हां भकाळीं गेलेल्या पोटांत काय भरायचें याची चिंता ! जीव नकोसा होतो. धरतीमायेला नवस सुरू होतात. 'आई, भरजरी हिरवा शालू नेस. जरा तुझें प्रेमळ रूप दाखव. नको डोळे वटारून या लेंकरांकडे पाहूं.' आईला हंसवण्यासाठीं व खूष करण्यासाठीं निस्त्राण झालेले हे सांगाडे घुमूं लागतात. बेहोष नाचूं लागतात. त्यांच्यांत कुठून




एवढी शक्ति येते, समजत नाहीं. त्या नाचांनीं धरतीमाय शहारून मोहरून येते. त्यांच्या हालांनीं आकाशहि द्रवतें, पाझरूं लागतें. धरतीमाय एक मादक गंध उधळते. भुकेनें कावलेलीं माणसें पुन्हां हंसूं लागतात. त्यांच्यांत त्या गंधानें हजार हत्तींचें जणुं बळ येतें. शेतें फुलूं लागतात. आकाशांतून कोसळणाऱ्या त्या धारांत शरीरें ओलींचिंब झालीं तरी हिरवा शालू नेसलेली धरतीमाय बघून मन हरखून जातें. तहानभूक विसरते. निवांतपणें तिच्याकडे पाहातच राहावेंसें वाटतें.

आणि ह्या लेंकरांच्या पोटांत दोन घास सुखाचे जाऊं लागतात. आंबीलच कां होईना, पण दिवसांत दोनदां मिळूं लागते. जरा घट्टशी मिळते. गवतासारखें येथलें जीवन. सहानुभूतीचे चार थेंब मिळालेरे मिळाले कीं लगेंच तें फुलतें, खुलतें. आनंदानें डोलूं लागतें.

पण मग हा पावसाचा माराहि असह्य होतो. वाटतें हें पाणी जरा आतां कमी व्हावें. झोपडीच्या छपरांतून ठिबकणारी ही देवाची करुणा गळ्यापर्यंत तुडुंब प्यालों. ओढे, नाले नाचूं बागडूं लागले. आतां जरा सूर्यनारायणानें दर्शन द्यावें. सृष्टिमाई त्यांची हीहि प्रार्थना ऐकते. आकाशाचें पाझरणें बंद होतें; पण पावसानें भिजून चिंब झालेल्या पंखांवर बसूनच सूर्याचें गारठलेले किरण धरतीवर उतरतात. पुन्हां हिंवाळा सुरू होतो. निसर्गाचे चाक कुंभाराच्या चाकासारखें एकसारखें फिरत राहतें. पुन्हां त्याच ठिकाणीं येईपर्यंत जुन्याची आठवण विसरतें आणि जुनेंच नवें वाटूं लागतें! सृष्टिमाईच्या रमणीय रूपांत सगळें दुःख हरपतें, कष्ट विसरतात आणि तिचीं बाळें 'येतां दिवस गेल्यापेक्षां बरा' असें म्हणून आनंदानें राहतात. दुःखें आठवणींचें रूप ल्यालीं कीं त्यांचा बोचरेपणा कमी होतो. उलट त्यामुळें आजचीं दुःखें जरा सुसह्य वाटतात. आंबट कैरी मुरवली कीं गोड होते, तसें त्या तुरट आंबट आठवणींचेंहि जणुं होतें.

☆ ☆ ☆




: २ :

गंजाम हा गरीब ओरिसांतला गरीब जिल्हा. त्यांतलें हें अकिली गांव. इतर आसपासच्या दहावीस गांवांसारखेंच. असेल पांचपन्नास उंबरा गांवांत. पण तसें हें म्हणणें अगदीं खरें नाहीं हो! घरें असलींच तर उंबरा म्हणायचें. येथें आहेत झोपड्या, कुडाचीं घरटीं. पण आपली पद्धत आहे म्हणून उंबरा म्हणायचें. ते तिकडे एक बऱ्यापैकीं घर आहे, तें आहे एका हलवायाचें. दुसऱ्या बाजूला जीं घरें दिसतात तीं आदिवासींचीं आणि हीं इकडलीं आहेत हरिजनांचीं. माणसाच्या शरीरावर त्याची परिस्थिति आपली झूब चढवते. त्याच्या शरीराकडे पाहिलें कीं त्याच्या धनदौलतीची कल्पना येते. त्याचप्रमाणें त्याच्या राहत्या घरावरूनहि त्याची हालत ओळखतां येते. हीं तीस एकतीस घरें आहेत त्यांची रया वेगळी आणि त्या बाकीच्या घरांची वेगळी. एखाद्या फुलांच्या हारांत मध्येंच एखादा फुलांचा पुंज असतो ना. तसेंच ह्या कळाहीन घरांच्या हारींत मधेंच तीं जरा बऱ्यापैकीं घरें दिसत आहेत.

ह्या घरांची बाहेरची दैना पाहून वाटतें कीं डोळे मिटून घ्यावें. पण आपण आलों आहोंत हें गांव पाहायला. शितावरून भाताची परीक्षा करायला. तेव्हां डोळे मिटून कांहीं भागणार नाहीं.

डोळे मिटून जर आपण परीक्षा करायला लागलों तर हत्तीची परीक्षा करणाऱ्या त्या आंधळ्यांसारखें होईल.

ते चार आंधळे होते ना, हत्तीची परीक्षा करणारे. एकानें हत्तीची शेपटी चांचपडली. तो म्हणाला: हत्ती वेलीसारखा आहे. दुसऱ्यानें धरले हत्तीचे पाय. तो म्हणाला: छे छे. हत्ती वेलीसारखा नसून घराच्या खांबासारखा आहे. तिसऱ्याच्या हातीं हत्तीची सोंड आली तो म्हणाला: कांहींतरीच! हत्ती वेलीसारखा नाहीं, खांबासारखाहि नाहीं, तो आहे वर उचललेल्या मुसळासारखा! चवथ्याच्या हातीं आले हत्तीचे कान. तो ओरडून म्हणाला: तुम्ही लबाड आहांत. तुम्ही सगळें खोटें सांगताहांत. ना हत्ती वेलीसारखा, ना खांबासारखा, ना मुसळासारखा. तसें म्हणणें म्हणजे सफेद झूट. तो आहे मोठ्या सुपासारखा!

आपण डोळे मिटून अंदाज घ्यायचा म्हटलें तर त्या आंधळ्यांसारखी गत व्हायची. उघड्या डोळ्यांनीं तर त्यांची दैना पाहवत नाहीं; पण न पाहून कसें चालेल? आपण डोळे मिटून घेतले म्हणून कांहीं त्यांची दैना मिटणार नाहीं. त्यांची दैना पाहिली पाहिजे. आपल्या हृदयांतल्या सहानुभूतीच्या अंगारावर जरा फुंकर मारली पाहिजे. ते जरा चेतवले पाहिजेत. मग निपचित झालेल्या या अवयवांत रक्त खेळूं लागेल आणि नवचैतन्यानें ते अवयव काम करूं लागतील.

पण ही दैना दिवसा उजेडी नसेलच पाहवत तर रात्रीच्या निवान्त वेळीं आपण जाऊं. हरून् अल् रशीद् जात होता ना आपल्या राज्याची पाहणी करायला गुपचूप, तसेंच आपण जाऊं या.


*         *         *

हे आपले देशबंधु. काय म्हणतां, हें बोलतांना जीभ चाचरते! पण नका तसें होऊं देऊं. खरोखरच हे आपले देशबंधु आहेत. व्याख्यानांत माझ्या बंधूंनो आणि भगिनींनो म्हणतांना विवेकानंदांचा

आवेश आपल्यांत येतो. पण हे लोक आपले भाऊबहिणी आहेत ही कल्पनाच करवत नाहीं. पण आई आपल्याला निवडायची नसते त्याप्रमाणें भाऊबहीण आपल्याला निवडायचे नसतात. असतील त्यांच्याशींच प्रेमानें वागायचें असतें. सुखाचा संसार करायचा असतो. तुमचा विश्वास बसला नाहीं तरी गोष्ट खरी आहे. कांहीं घरांत–झोपड्यांत डोकावून तरी पाहूं या. सगळीकडे फटी आहेतच. पाहायला कांहीं अडचण नाहीं.

*　　　*　　　*

ह्या झोपडींत अंगावरच्या कपड्यांखेरीज दुसरा कांहींच कपडा दिसत नाहीं. नाहींच आहे दुसरा कपडा घरांत. आणि त्या अंगावरच्या कपड्याला लक्तरें म्हणणेंच साजेल! सगळ्या वस्त्रांवर दारेंखिडक्या पडल्या आहेत. त्या कोपऱ्यांत तीं गाडगींमडकीं



अनुक्रम
विभाग

आहेत. उंदीर खडबडताहेत तेथें. पण बिचाऱ्यांच्या निराशाच पदरीं पडणार !

निजत असतील कशावर हे लोक ?

तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे ना, 'निद्रेसीं आसन, उत्तम पाषाण, वरीं हें प्रावर्ण आकाशाचें ' तशीच त्यांची स्थिति आहे.

हे लोक मग संतच म्हणायचे ?

त्यांची स्थिति आहे संतांसारखी. मन लहान मुलासारखें आहे. पण संतांचा साधेपणा समाजाच्या भल्यासाठीं असतो. ह्या लोकांत ह्या भावनेचा जर संचार झाला तर तेहि संतकोटीला पोंचतील. हे लोक नुसते गरीबच नाहींत, दरिद्री आहेत. दारिद्र्य हा मनाचा स्वभाव आहे, गरिबी ही परिस्थिति आहे. ह्यांची गरिबी राहिलेली एकवेळ परवडेल कारण परिस्थितीनें ती निर्माण केली आहे. परिस्थिति बदलली कीं गरिबी जाईल. पण यांचें दारिद्र्य घालवलें पाहिजे.

नाहीं आणखी पाहवत ! चला, दुसऱ्या घरीं चला.

* * *

हें दुसरें घर. फटींतून आंतलें सगळें स्वच्छ दिसत आहे. ती आई चूल फुंकीत आहे. मुलें भोंवतालीं बसलीं आहेत. डोळ्यांच्या पापण्यांवर पेंग बसल्यानें त्या जड झालेल्या दिसत आहेत. ओढून ताणून डोळे उघडे ठेवायसाठीं मुलें धडपडत आहेत. हें पाहा एक मूल तिथेंच लवंडलें. आईच्या चेहऱ्यावर एक हलकी हास्यरेखा क्षणभर चमकून गेली. दुसरें मूल किती आशाळभूत नजरेनें पाहतें आहे !

झोपडीचा दरवाजा कुणीतरी खडखडवला. तिचा माणूस आला वाटतें. चुलींत जाळ पाहून तो आश्चर्यचकित झाला आहे. चुलीवरच्या गाडग्याकडे पाहून त्याच्या चेहऱ्यावर किती विविध भावभावनांचा कल्लोळ माजला आहे ! घडींत आशा, घडींत चिंता, घडींत राग ! आकाशांतल्या ढगांप्रमाणें दरक्षणीं वेगळा आकार !



काय कुजबुजताहेत, तें तरी ऐकूं या.

' आतां चूल कशाला पेटवली ? '

' मुलें भुकेलीं आहेत ना ? '

' मग का आंबील करतेस ? '

' नाहीं. '

' मग काय शिजूं घातलें आहेस ? '

' कांहीं नाहीं. '

' मग चुलीला जाळ कां ? '

एवढ्यांत तें दुसरें मूलहि तिथेंच कलंडलें !

ती स्त्री सांगते आहे : ' आज दिवसभर पोटांत शीत नाहीं गेलें. मुलें कासावीस झालीं. दिवसभर मी समजूत घालीत होतें आतां बाबा येईल धान्य घेऊन. मग तुम्हांला शिजवून घालीन खाऊं. सांजपर्यंत बिचाऱ्यांनीं दम धरला. कालसुद्धां संध्याकाळीं त्यांनीं कांहीं खाल्लें नव्हतें. सांजला मग त्यांना [illegible] निघेना.

लागलीं रडायला. म्हणून मीं ही युक्ति काढली. चुलीला जाळ घातला. फुंकत बसलें. विचार केला, पाहून पाहून झोपीं जातील. निदान रात्रीचा प्रश्न मिटेल. झोपलींत बिचारीं!'

'तुझं हें बोलणें ऐकलें कीं जिवाची कशी कालवाकालव होते! पण काय करूं? रोजगारच कुठें नाहीं.'

'आज कांहीं मिळालें? दिवसभर कुठें होतात?'

'आपल्याकडे काम एखाद्या वेळीं मिळतें, पण मजुरी थोडीच मिळते! सकाळीं घराबाहेर पडलों तों फॉरेस्टसाहेबांचा पट्टेवाला रस्त्यानें जात होता. त्यानें नेलें धरून. दिवसभर सामान वाहून घेतलें नि दिलें हांकून.'

'कांहींच का नाहीं मिळालें तुम्हांला? कशाला करतां अशीं फुकटचीं कामें? इकडे पोरें उपासमारीनें तडफडताहेत आणि तुम्ही फुकटचीं कामें वेठतांहांत!'

'न करून सांगणार कुणाला? राखीव जंगलांतलीं लाकडें तोडलीं म्हणून खटले भरून डांबतात ना तुरुंगांत!'

'समजा माणसानें चोरलीं लाकडें. पण तीं कां चोरलीं नको का पाहायला! सुखासुखी का कोणी चोरी करतो!'

'जंगल राखण्याचें त्यांचें काम. तुम्ही उपाशीपोटीं आहांत का तुम्हांला अजीर्ण झालें आहे, याचें त्यांना काय?'

'मी नाहीं उद्यां घरीं राह्यची. मुलांचे ते चार घोट आंबिलीसाठीं गयावया करणें नाहीं मला पाहवत. तुम्ही संभाळा घरीं मुलें. मी आणीन जंगलांतलीं लाकडें.'

'अग पण लाकडें आणून करणार काय? लाकडें तर नाहीं मुलांना खायला घालतां येत? मी गेलों तर मोठा भारा आणून राणीखमाला जाऊन विकीन तरी.'

'पुन्हां नेतील तुम्हांला वेठीला धरून. तुम्ही सगळे मिळून 'नाहीं करीत' म्हणून कां नाहीं सांगत!'

‘ तसें केलें तरी काय उपयोग ? जंगलाच्या बाहेर कांहीं आमचा आवाज जात नाहीं. आम्हांला मारझोड करतील. हातपाय जायाबंदी करून देतील जंगलांत टाकून. एखादा वाघबीघ टाकील गट्ट करून. त्या शेजारच्या पोशाला नाहीं घालवलें ? कुठें गेला देव जाणे ! पण त्या दिवशीं वेठीला जो गेला तो नंतर दिसलाच नाहीं. ’

‘ कसा राजबिंडा होता दिसायला ! ’

नाहीं ऐकवत पुढचें ? चला दुसऱ्या झोपडीकडे.

* * *

ही शेजारचीच झोपडी. चांदणें झोपडीच्या छतांतून आंत डोकावतें आहे. जमिनीवर जणुं चांदण्याची रांगोळी काढली आहे.



आणि ती काळ्या दगडांतली नग्नमूर्ति कोणी त्या कोपऱ्यांत बसवली आहे? इथें सुद्धां कोणी मूर्ति घडविणारे पाथरवट आहेत कीं काय? छे, ती मूर्ति नाहीं. छाती खालींवर होते आहे! कीं तो भासच आहे? वर एक फाटकेंतुटकें लक्तर वाळत टाकलेलें दिसतें आहे. थंडीनें कसें शरीराचें मुटकुळें वळलें आहे त्या बाईनें. एकच कपडा. तो धुवायचा तर रात्रीं भुतासारखें ओहोळावर जावें लागतें. तिथें कपडा धुवायचा. तेवढ्यांत कुणाची चाहूल लागली कीं गळाभर पाण्यांत बुडायचें!

मागें एकदां ती पलीकडच्या घरची तानी रात्रीं कपडा धुवायला गेली तर पाणी प्यायला आलेल्या वाघानें तिला मटकावलें. आणि दोनच आठवड्यांनीं तिच्या शेजारच्या पाकळीला रात्रीं धुवायला जातांना साप चावला आणि ती दगावली! तेव्हां-पासून स्त्रियांची पांचावर धारण बसली आहे. एक तर मेला कपडा? चिंध्या होईपर्यंत वापरावा! कशाला धुवायचा अन् आपणहून जीव घालवायचा! पण तरीहि ह्या झोपडींतल्या त्या काळ्याकभिन्न मूर्तीनें न राहवून कपडा धुतलेला दिसतो आहे.

परमेश्वरा, हें दर्शन घडविण्यापेक्षां डोळे कां नाहीं रे मिटत आमचे!

हें पाहा, असें घाबरूं नका. यांना बंधुभगिनी नसेल म्हणायचें तर नका म्हणूं बापडे! पण तुम्ही डोळे मिटले तर काय होईल? जरा मन घट्ट करा. चला पुढें आतां त्या तिकडे पलीकडे जाऊं.

* * *

ही चार मंडळी अजून कसले खलबत करीत आहेत? कां जागताहेत रातची?

जरा ऐकूं या काय म्हणताहेत तें.

‘ तो गेनूचा बैल म्हातारा झालाय? ’

‘ त्यापरीस तो धुडकूचा बैल जरा बरा आहे. ’



बैलांचे हे व्यापारी का आहेत ?

बोलूं नका. त्यांना चाहूल लागेल. कसे कावरेबावरे झालेत तुमच्या कुजबुजण्यानें. पाहा तरी !

'कशाला कान टंवकारतां ? कोण येतेय इतक्या रात्रीं मरायला कानोसा घ्यायला ? अन् आलेच तर आहेच ती कोपऱ्यांत कुऱ्हाड !'

'पोलीस असतील सरकारी !'

'त्यांचें काय नडलें आहे अशा अपरात्रीं गस्त करायचें ? पडले असतील चौकींत बेहोष होऊन.'

‘आजचा आख्खा दिवस उपाशीतापाशी गेला. आपलें ठीक. पण पोराबाळांचें काय ?’

‘शेती असती तर हें पाप नसतें करावें लागलें !’

‘पापबीप सब झूट. पापपुण्यासाठींसुद्धां आधीं जगलें पाहिजे ना ?’

‘ज्यांच्यापाशीं शेती आहे त्यांचें काय भलें झालें आहे. आजच्या दुनियेंत कष्ट करून कोणाचेंहि भलें होत नाहीं. साहेब कष्ट करीत नाहींत, ते चैनींत असतात. आणि राणीखमाचे ते सावकार ! ते कुठें राबतात ! पण त्यांना कधीं पडलीय पोटाची चिंता ?’

‘आणि ते बिचारे शेतकरी, ते राब राब राबतात. पण तरीहि अन्नाला मोताद्च्या मोताद !’

‘आपल्याला मेलेलीं जनावरें खायचा धर्म लावून दिला आहे वाडवडलांनीं. त्याच्या बाहेर कशाला जायचें ?’

‘पण जनावरें मेलींच नाहींत तर ?’

‘तर त्यांनीं त्याची दवा सांगून ठेवलीच आहे कीं ! त्या झाडाचा पाला द्यायचा रात्रीं गुपचूप चारून म्हणजे सकाळीं पीक हातांत ! शेतांत दाणे पेरावे, चार महिने राखण करावी, चोरा-पोरांना, पक्ष्यापांखरांना हुसकत बसावें, सावकाराची नजर चुकवावी, तेव्हां दोन महिन्यांचे दाणे घरला यायचे !’

‘आपली शेती सोपी. रात्रीं पेरायचें कीं सकाळीं पीक हातांत ! पुन्हां त्यांत वांटेकरी नाहीं. चोराचिलटांची भीति नाहीं !’

‘मग काय करायचें ! आतां उशीर केला कीं पहाटे पीक नाहीं हातीं यायचें ! जर धुगधुगी असेल तर त्या हलवायाच्या दव्यानें जनावर पुन्हां उठून उभें राहतें म्हणतात. झटपट उरकलें पाहिजे काम !’

‘उठाच आतां.’

किती क्रूर हीं माणसें, असें तुमचें म्हणणें. पण यांना नीटपणें जगूं न देणारे नाहींत का क्रूर ? कष्ट करायला त्यांची तयारी नाहीं असें नाहीं. देवानें दिलेले हात राबवावे व लक्ष्मी आणावी, ही त्यांची इच्छा. पण त्यांना वाव नाहीं. ईश्वरानें दिलेलीं इंद्रियें वापरण्याची माणसांना संधि मिळूं न देणें हें फार घोर पाप आहे!

आणि समाजांतले पुढारलेले लोक तरी कोणता आदर्श घालून देताहेत ? 'जे जे आचारितो श्रेष्ठ, तें तेंचि दुसरे जन। तो मान्य करितो जें जें, लोक चालवितात तें ॥' असें गीतेनें म्हटलें आहे. कष्ट न करतां जर शिकलेसवरलेले, पुढारलेले चैनींत राहतात, तर या लोकांनीं कां कष्ट करावे ? राब राब राबणाऱ्याला इथें उपासपोटीं दिवस काढावे लागतात. त्याला राहायला नीट घर नाहीं, वापरायला धड कपडा नाहीं आणि आळसांत राहणारे चैनींत आहेत. मग त्यांनीं तोच रस्ता कां चोखाळूं नये ?

नका, बोलूं नका. डोकें बधिर झालें आहे. डोळे थिजले आहेत. मन बोथटलें आहे.

घाबरूं नका, आणखी एकाच घरांत आतां डोकावूं आणि परतूं या.

* * *

अंधारांत दिसत नाहीं, पण दोन व्यक्ति आहेत ह्या कुणीतरी. एक बाई दिसते आहे, दुसरा पुरुष आहे. अंगावर लक्तरेंच आहेत. पण डोळ्यांत कसला तरी हीन आनंद चमकतो आहे.

हीं मडकीं कसलीं आणलींत यांनीं ? त्या छोट्या गाडग्यांनीं त्यांतून कांहीं काढलें वाटतें ? काय हा भपकारा. सहन नाहीं होत. चला, चला निघा.

असे घाबरूं नका. भंग्यासारखे नाकाला फडकें लावा आणि धीर करून उभे राहा.



गाडग्यावर गाडगीं ढोसताहेत. हंसताखिदळताहेत. ती बाई सुद्धां त्या पुरुषाप्रमाणेंच पिते आहे. आतां बरळायला लागली. हातांना तें गाडगेंहि जड झालें वाटतें ! हात थरथर कांपतो आहे.

‘ तूं मला आणखी दे. ’

‘ देणार नाहीं ! ’

‘ देणार नाहीं ? कशी देत नाहीं पाहतो ! ’

तो उठला. झोकांड्या जात आहेत. पडला धाडकन्. तरी दमदाटी, बरळणें चालूच आहे.

‘ दे दे. आणखी एक गाडगें दे. तूं माझ्यापेक्षां जास्त ढोसलीस. ’

‘ घ्या. घाला मढ्यावर. हें अर्धेंच गाडगें आहे आतां. ’

‘ मला सबंध पायजे. अर्धें नको. तूंच अर्धें प्यालीस ! ’

‘ हें अर्धें घ्या. नाहींतर तेंहि मी टाकतें पिऊन ! ’

'बरं आण.'

तिचेहि पाय लटपटताहेत. गाडगें घेऊन कोसळली त्याच्या अंगावर. त्याच्या कपाळावर तें गाडगें आपटलें. खोक पडली. रक्त वाहूं लागलें वाटतें. पण त्यांना शुद्ध नाहीं. सर्व दुःखांवरचा हा एकच रामबाण उपाय आहे इथें.

* * *

हें कसलें गांव काढलेंत दाखवायला ? आम्ही तर ऐकत होतों. उत्कल ही फार थोर भूमि आहे. इथेंच पतितपावन जगन्नाथाचें तें मंदिर ! इथेंच भुवनेश्वरचीं तीं देवळें ! इथेंच तें कोणार्क ! इथेंच अशोकाला उपरति झाली आणि चंड अशोक, धर्म अशोक झाला. ज्याचें नांव ऐकून लोकांचा थरकांप होई, तो अशोक देवांचा प्रिय झाला. इथें इतकी अघोर स्थिति !

घाबरूं नका. कासावीस होऊं नका. ही धर्मभूमि आहे, देवभूमि आहे. इथें तेलवात तयार आहे. एक पणती पेटलेली आली पाहिजे. हजारों पणत्या तिच्यावर पेटतील. अंधार उजळून निघेल. देवजन्माची पूर्व तयारी झाली आहे. धरित्रीचा भार वाढला, असह्य झाला आहे. पुनःपुन्हां जन्म घेण्याचें भगवन्ताचें आश्वासन विसरूं नका. मात्र तो आलेला ओळखा. फसगत होऊं देऊं नका. त्याला ओळखले नाहींत, तर तो परतून जाईल.

येशू ख्रिस्तानें सांगितलेली ती गोष्ट आहे ना ठाऊक ?

कोणती ?

देवाकडे दोन लोक आले. त्यांनीं देवाला नमस्कार केला.

एकाला देव म्हणाला; तूं इकडे माझ्याजवळ ये. तूं चांगला आहेस. मी भुकेला होतो, तेव्हां तूं मला खाऊं घातलेंस. मी आजारी होतों, तेव्हां तूं माझी सेवा केलीस. मी तुरुंगांत खितपत होतों, तेव्हां तूं मला दिलासा दिलास; अंतर दिलें नाहींस.

तो म्हणाला : देवा, तुम्ही कधीं भुकेले होतां आणि मी अन्न दिलें ? तुम्ही कधीं आजारी होतां नि मी सेवा केली ? तुम्ही कधीं तुरुंगांत होता नि मी तुम्हांला दिलासा दिला ?



देव म्हणाला : माझ्या एकाहि मुलाशीं तूं असा वागलास, म्हणजे माझ्याशींच वागलास.

मग दुसऱ्याकडे वळून तो म्हणाला : तुला मी जवळ घेऊं शकत नाहीं. मी उघडा होतों, तेव्हां स्वतःला कपड्यांत लपेटून घेऊन तूं माझा तिरस्कार केलास ! मी रडत होतों तर तूं मला हंसलास, माझे अश्रु पुसले नाहींस ! मी निवारा शोधीत होतों तेव्हां तूं मला ओसरी-वरूनहि हुसकून दिलेस ! जा दूर हो.

तो म्हणाला : देवा, तुम्ही कधीं उघडेवाघडे होतां आणि मी कपडा दिला नाहीं ? तुम्ही कधीं रडत होतां आणि मीं आसवें पुसलीं नाहींत ? तुम्ही कधीं निवारा शोधीत होतात आणि मीं हुसकून दिलें ?

देव म्हणाला : तूं माझ्या एकाहि मुलाशीं असा वागला नाहींस म्हणजे माझ्याशींच वागला नाहींस. जा. येथून नीघ. नीट वागायला शीक आणि मग माझ्याजवळ बसायला ये.

तो मनुष्य गेला. शहाणा होण्यासाठीं गेला. दुःखितांचे अश्रु पुसायला गेला. दलितांना दिलासा द्यायला गेला. उपाशी असलेल्यांना भाकरी द्यायला गेला. उघड्यांना कपडा लेववायला गेला. आजहि तो कोणत्या ना कोणत्या रूपानें फिरतो आहे. त्याला ओळखलें मात्र पाहिजे. देवाचा संदेश घेऊन तो फिरतो आहे.

पाहा दिसला तर. ओळखा त्याला आणि त्याच्या कामांत मदत करा.

* * *

उतरा आतां हा हरून अल् रशीद्‌चा पोशाख आणि चढवा आपले नेहमींचे कपडे.

☆ ☆ ☆

## पाहुणे : ३ :

त्या दिवशीं उगवलेला सूर्य जणुं वेगळा होता. सगळें वातावरणच बदललेलें होतें. वारे त्या दिवशीं वेगळाच गंध वाहात होते. पक्षी वेगळींच गीतें गात होतें. ओहोळाच्या खळखळींतून निराळाच ध्वनि निनादत होता. लतापल्लवहि जणुं कोणाची उत्सुकतेनें वाट पाहात होते.

गांव अंग झाडून अजून आळोखे पिळोखे देत होतें. इतक्यांत आवाज ऐकूं आला. 'आनंदे एकवार' ... ...

'...हरी बोल, हरी!'

'आनंदानें एकदां हरिनामाचा गजर करा' ही घोषणा अकिलींत त्याआधीं कधीं घुमली नव्हती. त्या डोंगरांनींहि ह्या घोषणेला साद दिली. सरकारी अधिकाऱ्यांच्या धमक्या आणि मारझोडीच्या किंकाळ्या यांनींच तो डोंगर नेहमीं घाबराघुबरा व्हायचा. पण आज हरिनामाचा गुंजारव तो घुमवीत होता.

गांवांतील झोपड्या दिसूं लागल्या तसा घोष बदलला. 'आमा गाँरे भूमिहीन...'

'...कोई रहिबे नाहीं, रहिबे नाहीं'

आमच्या गांवांत भूमिहीन कोणी राहणार नाहीं, असा निर्धार त्या खणखणींत आवाजांत ऐकूं येत होता. मग एक गाणें सुरू झालें–

सब भूमि भाई गोपाळार
भूमिदान देई हूए दानबीर

सगळी भूमि भगवंताची आहे. भूमिदान देऊन तुम्ही दानवीर व्हा. हा सौदा फार स्वस्त आहे. जें आपलें नव्हतें, आणि नाहीं त्याची आस सोडा आणि दानवीर व्हा!

*　　　*　　　*

अकिलीला हे स्वर अगदीं नवे होते. अकिलींत शिकले सवरलेले लोक येत असत, नाहीं असें नाहीं. पण जे येत ते व्यापारी, सावकार किंवा सरकारी अधिकारी म्हणून. व्यापारी–सावकारांची फेरी हंगामांत होई. मोठमोठ्या चोपड्या घेऊन येत. पूर्वीं जे दहा-वीस रुपये दिलेले असत त्याच्या व्याजापोटीं खळ्यांतलें निम्मेंशिम्में धान्य ते उचलून नेत. व्यापारी येत आणि हातीं लागेल तीं नाणीं शेतकऱ्यांच्या अंगावर टाकून हवें तें धान्य घेऊन जात. पिकलेल्याचा पांचवा, सातवा भागदेखील शेतकऱ्यापाशीं राहात नसे.

सरकारी अधिकारी येत ते मोठ्या लव्याजम्यानिशीं. त्यांची सरबराई करावी लागे. गांवांतलें सगळें दूध त्यांच्या सेवेला हजर व्हायचें. गांवांत कोणाकडे चांगल्या शेळ्या आहेत, कोणाकडे कोंबडीं आहेत याची चौकशी व्हायची. हलवायाच्या ओट्यावर मुक्काम असायचा आणि तेथून एकेकाला नजराणा घेऊन बोलवलें जायचें! साहेबांचा रुबाब केवढा! सावकार–व्यापारी यायचे तर त्यांचाहि तांडा असायचा. त्यांचाहि मुक्काम त्या हलवायाच्या

दुकानावरच. तो हलवाई जणुं त्यांचा दलाल. सगळी खडान् खडा माहिती तो द्यायचा.

पण आज आलेल्या त्या इसमाचे मंत्र वेगळे होते. त्याच्या चेहऱ्यावर भावहि निराळे होते. त्याचा पोषाखहि वेगळा होता. त्या आदिवासींसारखाच तो पुरुष उघडाबंब होता. दाढी बोटबोट वाढलेली होती. खालीं गुडघाभर एक पंचा लावलेला. त्याला त्याच्या बरोबरचे लोक म्हणत होते गोपबाबू. त्या बाई......त्यांचें नांव रमादेवी. पण त्यांना सगळें म्हणायचे 'बोऊ'–आई. तो तरुण होता त्याचें नांव मनमोहन. पण त्याला सगळे म्हणायचे बुलूभाई. त्यांचा वेशहि साधाच होता.

गांवांत येणाऱ्या सुशिक्षितांचा रिवाज त्या हलवायाच्या दुकानावर जाण्याचा. पण ह्या मंडळींनीं एका आदिवासीच्या झोपडी



समोर आसन ठोकलें. भराभरा गांवांतलीं मुलें गिल्ला करीत तेथें जमलीं. त्यांच्या घोषणा, गाणीं चाललींच होतीं. हळूं हळूं मुलें त्या घोषणांत सामील झालीं. 'आमा गाँरे भूमिहीन, कोई रहिबे नाहीं, रहिबे नाहीं.' बुलूभाईनीं मुलांना एका रांगेत उभें केलें. त्यांना हात उभारून 'रहिबे नाहीं, रहिबे नाहीं' म्हणायला शिकविलें.

गांवांतला हा होहल्ला ऐकून स्त्रिया आपली लाज सांभाळीत आणि पुरुष दबकत दबकत तिथें जमले. बोऊंनीं त्या बायकांना मोठ्या प्रेमानें बसतें केलें. गोपबाबूंनीं पुरुषांना जवळ बसविलें. हरिजन एका वेगळ्या बाजूला उभे होते.

आदिवासींतला एक इसम पुढें झाला. म्हणाला : 'साहेब, त्या दुकानावर चला ना?'

'आम्ही साहेब नाहीं. आम्ही तुमच्यांतलेच. तुमचेच भाऊबंद. तुम्हांला काय दुखतेंखुपतें तें ऐकायला आलों. इथें तुमच्यांतच बसतों. हेंच ठिकाण चांगलें.'

गांवकऱ्यांना भारी आश्चर्य वाटलें. आजवर त्या गांवांत जे शिकलेसवरले आले होते त्यांचा रिवाज ह्यांनीं मोडला होता. ते यायचे ते लुटायला. वेठ करून घ्यायला. रुबाब दाखवायचे. दम द्यायचे. पण इथें सगळेंच वेगळें. त्यांची भाषा वेगळी. बोलणें वेगळें.

* * *

बुलूभाईनीं गोष्ट सांगायला सुरुवात केली.

एकदां एका गाडींतून दोन प्रवासी जात होते. एक गरीब दुबळा होता. दुसरा होता श्रीमंत. गरिबाच्या जवळ होते पांच रुपये. त्या श्रीमंताजवळ हजार रुपये होते! वेळ रात्रीची. दोघांना झोप यायला लागली. श्रीमंत मनुष्य हुषार होता. तो म्हणाला, 'हें पाहा भाऊ, गाडीचा प्रवास कठिण. सारखे प्रवासी चढत असतात, उतरत असतात. कोणाचा भरंवसा धरतां येत नाहीं. तुम्ही आपले संभाळून राहा. जागे असा. झोपूं नका.'

त्या गरिबाला वाटलें हा आपला हितकर्ता. तो पांच रुपयांची कनवठीची नोट हातांत आवळून जागत बसला. हा हजार रुपये खिशांत असलेला निवांतपणें घोरूं लागला !

ज्यांच्याजवळ जमिनीचा थोडा भाग आहे त्यांनीं आपल्या थोड्या जमिनीचा लोभ धरला कीं त्या मोठ्या जमीनवाल्याच्या जमिनीचें आपोआपच रक्षण होतें. ते निवांतपणें चैनींत झोपतात आणि हा लहान जमीनवाला जागत बसतो...

इतक्यांत जवळच दोघांचा आरडाओरडा ऐकूं आला. बुलूभाई-सुद्धां सगळ्यांचें लक्ष तिकडे वळलें. भांडत भांडत ते दोघे सभेच्या जागेकडेच आले.

गोपबाबूंनीं त्यांना शांत केलें. म्हणाले : 'काय भांडण आहे?'

'मी याच्या बैलांना मारून टाकीन, सोडणार नाहीं.'

'तूं माझ्या बैलांना हात तर लाव. बघ तुझे तंगडेंच मोडतों.'

'पाहूं पाहूं, काय हिंमत आहे तुझी ती.'

'पाहतो काय ? तुझ्या शेतांत उद्यां सगळीं गुरें घालतो, काय समजलास तूं !'

गोपबाबू म्हणाले : 'अरे, हो हो. काय भानगड आहे तें तर सांगा ! आणि आपसांत भांडून काय होणार ? तूं त्याचा बैल मारला, त्यानें तुझें तंगडें मोडलें. तूं त्याच्या शेताला आग लावलीस, त्यानें तुझें पीक कापून नेलें. यानें काय साधणार ? वैरानें का कोठें वैर शमते ? भांडून का कधीं भांडण मिटतें ? गांवच्या पंचांकडे जावें.'

'पंचांकडे ?'

'अहो, काय वेड का काय ?'

'त्यांत वेड कसलें ?'

'अहो, पंचहि तरी आपली गुरें रात्रीं दुसऱ्यांच्या शेतांत चारायला घालतातच ना ?'

'हें असें कां होतें ?'

‘ आम्हांला नाहीं ठाऊक ! ’

‘ नाहीं ठाऊक ? सोपें आहे याचें कारण ! अरे तुम्ही अमुक शेत माझें म्हणतां तेव्हां सगळ्या गांवच्या शेतीवरचा हक्क गमावतां. जर सगळ्यांची शेती एक झाली. शेतीची मालकी गांवाची झाली तर कुणी कुणाच्या शेतांत बैल चारील का ? ’

‘ बरोबर आहे. ’

‘ तुम्ही आपल्या घरांतला कचरा काढलात, दुसऱ्याच्या झोपडीपुढें टाकला. दुसऱ्यानें तिसऱ्यापुढें. असें केलें तर गांव कधीं स्वच्छ होईल का ? तुम्ही एकमेकांशीं बसाल भांडत. आणि दुसरें तुमच्या भांडणाचा फायदा उठवतील. ’

‘ मग काय करावें ? ’

‘ जमीन साऱ्या गांवाच्या मालकीची करा, सगळे झगडे मिटतील. मग कोणी कोणाच्या बांधावर जनावरें नाहीं चारणार. ’

‘ बरोबर आहे. ’

‘ सब भूमि अरे भाई ... ...’

‘ गोपाळार ... ... ’

‘ तुम्ही एकमेकांविषयीं बेफिकीर आहांत. त्यामुळें तुम्हांला सगळे नाडतात. ’

‘ आम्हांला वेठीला धरून नेतात— ’

‘ काय अजून वेठीला धरून नेतात? स्वातंत्र्य मिळून सात वर्षं झालीं तरी हें चालू आहे. अरेरे......तुम्ही सगळे एकजूट कां करीत नाहीं ? स्वातंत्र्य शहरांत आलें पण ह्या आदिवासी बंधु-भगिनींच्या वांट्याला तें केव्हां येईल ? ’

‘ शहरी लोकांनीं एकजूट केली. त्यांना स्वातंत्र्य मिळालें. तुम्ही गांवकऱ्यांनीं एकजूट केली तर तुमचीहि गुलामी जाईल. ’

गोपबाबूंच्या डोळ्यांतून घळघळां आंसवें वाहूं लागलीं.

गांवकरी आश्चर्यचकित झाले. हें दृश्य नवेंच होतें. त्यांची दैना पाहून लोक हंसत. त्यांच्या दुबळेपणाचा फायदा घेत. पण हा महापुरुष व्याकुळ झाला होता. त्याच्या डोळ्यांतून आंसवें वाहात होतीं.

संत आणि सती यांचे अश्रु कधीं फुकट जात नाहींत.

'आमच्या खळ्यांतलें धान्य सावकार उचलून नेतात.'

'पिकवतो आम्ही पण आम्हांला सहा-आठ महिने आंब्याच्या कोई, फणसाच्या आठळ्या आणि चिंचोके यांच्यावरच गुजराण करावी लागते!'

'अरेरे...अरेरे...काय ही दुर्दशा. माझेंच चुकलें. मी आजवर कां नाहीं आलों इथें?'

* * *

बुलूभाई सांगत होते: 'तुमच्या जमिनी वेगळ्या. तुमचीं मनें वेगळीं. सावकार एकेकाला गांठतो. दुसरा नुसता पाहात राहतो. तुम्ही सगळ्या गांवाची जमीन एक करा. मनें सांधा. एका कुटुंबासारखें राहा. सावकार आला, दलाल आला तर सांगा: तुझें कर्ज बुडवायची आमची इच्छा नाहीं. पण एकेकाशीं तूं बोलूं नकोस. गांवाची सभा भरवूं तिथें रुजवात करूं. सरकारी अधिकारी आले तर सांगा: गांवाची सभा घ्या. तुमचें काय काम फुकट करायचें तें सांगा. एकेकाला गांठूंभेटूं नका; काम सांगूं नका.

'एकीचें बळ मोठें आहे. केकतडीचा एकेक धागा घेतला तर तटकन् तुटतो, पण पांचपन्नास धागे एकत्र करून त्याचा दोर वळला तर तो हत्तीलाहि बांधून ठेवतो.'

* * *

रमादेवी स्त्रियांना सांगत होत्या: 'तुम्ही ताडी पिऊं नका. नवऱ्यांना, भावांना पिऊं देऊं नका. व्यसनें सोडा. गांवाचें भलें होईल.'

बोऊंचें म्हणणें बायकांना पटत होतें.

‘ नाहीं तर काय ? दारू पिऊन येतात आणि मार मार मारतात. ’

‘ पुरुषांना नको नांवें ठेवायला. आपण पितों आणि त्या बिचाऱ्या पोरांना बदडतों तें. ’



‘ भूक विसरायला तोच एक मार्ग आहे. ’

‘ दारू पिऊन विसरलेली भूक तर दुसऱ्या दिवशीं अकराळ विकराळ होऊन मागें लागतें ना ? ’

‘ तेंहि खरेंच. दारू बंद झाली पाहिजे. ’

‘ गांवाची जमीन गांवाची झाली पाहिजे. ’

गोपबाबू उठले. सांगूं लागले : ‘ विनूमहाप्रभूंचें हेंच सांगणें आहे. ते म्हणतात : जमीन आपण केली नाहीं. देवानें केली. ती आपली कशी ? ती तर आपली आई. तिचा कोणी मालक कसा ? आईचा का कोणी मालक असतो ? आपण सगळीं काळ्या आईचीं लेंकरें. आपण एका कुटुंबाप्रमाणें राहूं. विनूमहाप्रभू गांवोगांव फिरून हेंच सांगतात. अकिलीच्या लोकांनीं जमीन द्यावी. गांवाची मालकी करावी. एकोप्यानें राहावें. दारू सोडावी. त्यांना भले दिवस येतील.

'तो पाहा तो सूर्य हेंच सांगतो आहे. त्याच्या प्रकाशावर का कोणाची मालकी आहे? ते वारे हेंच गाणें गात आहेत. ती नदी हाच मंत्र जपत आहे. तारेवारे आणि पाणी यांच्यावर सर्वांची मालकी तशीच जमिनीवर.'

'विनूमहाप्रभूकी जय'......

सगळ्यांत वेगळेंच चैतन्य पसरलें.

गोपबाबू, बोऊ, बुलूभाई आणि स्वयंसेवक यांनीं त्यांच्याबरोबर गाणीं म्हटलीं. जेवले. रात्रीं रत्नखचित आकाशाखालीं प्रार्थना केली. आणि दुसऱ्या दिवशीं पहाटे ते कुसुमपूरकडे रवाना झाले.

म. ... ग्रंथालय
ग्रा. क्र. ६५६९
दि. ...

## वनवास

: ४ :

समाज म्हणजे जणुं शंकर. तो घडींत खूष होऊन वर देईल, नाहींतर रुद्र बनून सत्त्वपरीक्षा करील. ह्या परीक्षेंत उतरला कीं त्याचें शिवरूप कल्याण केल्याखेरीज राहणार नाहीं.

गोपबाबू, बोऊ आणि बुलूभाई अकिलींत आले आणि केवळ चार शब्द बोलून गेले. पण आसपासच्या डोंगरदऱ्यांतून, रानावनांतून ते शब्द कितीतरी वेळ निनादत होते. अकिली निवासींच्या मनाच्या आकाशांत त्यांचे प्रतिध्वनि कितीतरी वेळ उमटत होते.

हलकीं पानें ज्याच्याजवळ आलीं असतील त्यानेंच आधीं पत्त्यांचा आपल्या हातांतला डाव टाकावा, म्हणजे इतरहि टाकतात. मग पुन्हां पिसणी, पुन्हां वांटणी. डाव लागला तर खेळांतली सगळी गंमत जाते. खेळाचा बेरंग होतो.

गांवकऱ्यांनीं ठरवलें : जीवन नीरस झालें आहे. डाव रंगत नाहीं. डाव लागल्यामुळें खेळाडूपणाऐवजीं परस्परांत जीवघेणी वृत्ति



निर्माण झाली आहे. त्यांनीं पुन्हां पिसण्यासाठीं डाव मोडायचें ठरवलें. ज्यांच्याजवळ जमिनी होत्या त्यांनीं दानपत्रें भरलीं. सर्व गांवकऱ्यांनीं सारखेंच व्हायचें ठरवलें. एक तीळ सात भावांनीं खाल्ला नव्हता का ? एकमेकांशीं हेवेदावे साधण्याऐवजीं सर्वांनीं एकजुटीनें सुखाचे, सोन्याचे दिवस आणण्यासाठीं पराक्रम करायचे ठरवलें. दारू सोडायचा निश्चय केला.

गोपबाबूंच्या मागोमाग एक गांवकरी दौडत गेला. सर्व गांवचीं दानपत्रें गोपबाबूंच्या हवालीं करून विनूमहाप्रभूंना पोंचवायला सांगितलें. तो निरागस, भोळा भाव पाहून गोपबाबूंचे डोळे पाणवले.

* * *

आसपासच्या गांवांत वणव्यासारखी बातमी पसरली. अकिलीनें विनूमहाप्रभूंना सारी जमीन अर्पण केली. आतां गांवांतले सगळे भूमिपुत्र होणार. गांवानें व्यसनें सोडायचें ठरवलें. ह्या अकिलीच्या निर्धारामुळें शेजारपाजारच्या गांवांतल्या सावकार–दलालांची, सरकारी अधिकाऱ्यांचीं धाबीं दणाणलीं. अकिलीच्या

श्री. दीनबंधु ब्रह्मव्रत यांनीं ग्रामदानाच्या बाबतींत पुढाकार घेतला. ३६ रुपयांचें शेअरकॅपिटल उभारून शेतीसुधारणा सहकारी संघाची १९५५ सालीं स्थापना झाली. ५०० रुपये बँकेकडून कर्ज मिळालें असून गांवचा जादा शेतीमाल या संस्थेतर्फेच विकण्यांत येतो. लोकांसाठीं एक सहकारी भांडारहि चालविण्यांत येते.

गांवांत ३८ चरखे चालतात. स्त्री—पुरुष नेमानें कताई मंडळांत येऊन सूत काढतात. ३० मुलें टकळ्या चालवतात. जवळ जवळ १० शेर सूत दर महिन्याला निघतें. कपाशीची लागवड गांवानें केली आहे.

सरकारकडून गांवाला पुढीलप्रमाणें मदत मिळाली आहे : ग्रामभवन २५० रुपये, रस्ता २७५ रुपये, विहीर २००० रुपये, तलाव दुरुस्ती १००० रुपये. याशिवाय सर्व सेवा-संघानें गांधी-घरासाठीं २५०० रुपये दिले आहेत.

रात्रशाळा चालते तिच्यांत २२ प्रौढ आहेत. पूर्व प्राथमिक बालवाडींत १९ मुलें आहेत. वाचनालयांत २५० पुस्तकें आहेत. गांवाच्या नवनिर्माण कार्याची जबाबदारी एक पदवीधर तरुणानें उचलली आहे.

गांवांत विडीकाडी व दारूचें नांव नाहीं. गांव पूर्ण व्यसनमुक्त आहे. लग्नादि समारंभ सबंध गांवाचे म्हणून साजरे होतात.

उत्कलचे ओरिसाचे माजी मुख्य प्रधान नभकृष्ण चौधरी यांच्या पत्नी श्री. मालतीदेवी या गांवाच्या विकासाकडे खास लक्ष पुरवीत आहेत.

संपादक ' ग्रामदान ' कडून

IRBK-0106261
IRBK-0106261
अनुक्रम
दिनांक
क्रमांक
नों. दि.

# प्रौढ शिक्षणमाला :

## नवसाक्षर प्रौढांना उपयुक्त अशीं नवीन प्रकाशनें

१ : पुनर्जन्म
ले. सौ० माणिक पटवर्धन — ०- ८-०

२ : मुरारींचें साळगांव
ले. ना. ग. गोरे — ०- ८-०

३ : आपली जिमीन
ले. गो. नी. दांडेकर — ०- ८-०

४ : जागते देव
ले. शरच्चंद्र गोखले — ०- ८-

५ : चार फरार
ले. यदुनाथ थत्ते — ०- ८-

६ : हिरापूरचे हजार हात
ले. देवळे–जोशी — ०-१०-०

७ : बिनबियांचें झाड
ले. व्यंकटेश माडगूळकर — ०-१०-०

८ : गारव्यांतील मुलाखती
ले. शरच्चंद्र टोंगो — ०- ८-०

९ : रानगांवचा संसार
ले. प्रभा परुळेकर — ०- ८-०

१० : जनूकाका
ले. वा. रा. सोनार — ०- ८-०

११ : गहिना
यदुनाथ थत्ते — ०- ८-०

१२ आनंदधाम
ले. सुमती पोंक्षे — ०-१०-०

१३ पांढा
ले. शं. रा. देवळे — ०- ८-०

**चि त्र शा ळा प्र का श न,**

१०२६ सदाशिव, पुणें २.